# बापु नायर टोळीतील मोक्का अंतर्गत पाहीजे असलेला गँगस्टर नितेश बसवंत याला पिस्टल व जिवंत काडतुसांसह अटक युनिट-३ ची कारवाई

---

सन २०१५ मध्ये कोंढवा पोलीस ठाणे हद्दीत जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्यामुळे रेकॉर्डवरिल टोळी प्रमुख बापु नायर आणि त्याचे साथीदारांवर कोंढवा पोलीस ठाणे गु.र.नं ४७७/२०१५ भा.द.वि.क ३०७, ३८७, ४४०,५०४, ५०६(२),३४ मो.का.१९९९ चे ३(१)(ii)(२)(३)(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्यातील आरोपी हे संघटीत गुन्हेगारी करीत असल्याने या गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनीयम १९९९ प्रमाणे कलम लावून मोक्का कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आली होती.

बापु नायर टोळीतील सक्रीय सदस्य नितेश श्रिनीवास बसवंत वय २६ वर्ष रा. अपर इंदिरानगर बिबवेवाडी पुणे हा मागील दिड वर्षापासून या गुन्ह्यात फरार होता. आरोपी नितेश बसवंत हा सातत्याने राहण्याची ठिकाणे बदलुन पोलीसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न करीत होता. आरोपी खडकी पुणे या परिसरात येणार असल्याबाबतची गोपनीय माहीती युनिट-३ गुन्हेशाखा येथील पोलीस नाईक संदिप तळेकर यांना मिळाली होती. त्यानुसार सापळा रचुन आरोपी नितेश श्रीनीवास बसवंत याला ताब्यात घेतले असता, त्याचेकडे गावठी बनावटीचे पिस्टल, २ जिवंत काडतुसे, वेगवेगळया कंपनीचे ८ मोबाईल हँन्डसेट, वेगवेगळ्या मोबाईल कंपनीची ११ सिमकार्ड मिळून आली.

कामगिरी मा. श्री. डॉ. के. व्यंकटेशम, पोलीस आयुक्त सो, पुणे शहर, मा. श्री. शिवाजी बोडखे, सह पोलीस आयुक्त सो. पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखचे मा. श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त, मा. श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त-१. यांचे सुचनांनुसार, युनिट ३ गुन्हे शाखा चे दिनकर मोहिते वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप नारायण देशमाने सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस कर्मचारी संदीप तळेकर, अशोक भोसले, रोहीदास लवांडे, गजानन गाणबोटे, अतुल साठे, सुजित पवार, मच्छिंद्र वाळके, शिवानंद स्वामी, निलेश पाटील, संदीप राठोड, कल्पेश बनसोडे, यांनी केली आहे.